पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी,
पुणे – ४११ ०१७
जा.क्र.ड/१३/कावि/ १५१/ २०१८
दिनांक– २८/ ०९ / २०१८

प्रति,
मा.श्री/श्रीमती ----------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------

विषय :- ड प्रभाग समितीची मासिक सभा कार्यपत्रिका क्र. ७ दिनांक ०५/१० /२०१८

महोदय,

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१८ ची मासिक सभा ड क्षेत्रिय कार्यालयाचे "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे शुक्रवार दिनांक ०५/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

सदर सभेमध्ये सोबत जोडलेल्या कार्यपत्रिकेप्रमाणे कामकाज करण्यात येईल. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
**सही/-**

**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव, सभाशाखा**
ड क्षेत्रीय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे-१७

सोबत - कार्यपत्रिका क्र: ७
दिनांक:- ०५ /१० /२०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे-१७**

**ड प्रभाग समिती,**

**कार्यपत्रिका क्र. ७**

दिनांक :०५ /१०/२०१८ वेळ दुपारी १२. ०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१८ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५ /१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालयाचे "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजित केलेली आहे. सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज होईल.

१) मागील सभा कार्यपत्रिका क्र. ६ माहे सप्टेंबर २०१८ चा सभावृत्तांत कायम करणे

२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग कार्यक्षेत्रातील हॉकर्स झोन पुर्न:स्थापित करणेकामी मा. आयुक्त यांनी दिनांक २७/३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेत दिलेल्या सूचनेनुसार ड प्रभागासाठी प्रभाग स्तरावर फेरीवाला उपसमितीचे गठन करण्यात आले असुन त्यात क्षेत्रिय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र व राज्य शासन तसेच मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार ड क्षेत्रिय कार्यक्षेत्रात हॉकर्स झोन निश्चित करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात आली असुन निश्चित करणेत आलेल्या हॉकर्स झोनचे सोबतचे प्रपत्र अ चे अवलोकन होऊन झोन निश्चितीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव

३) वाकड उड्डाणपुलापासून ते काळा खडक पर्यंत जाण्याचा रोड मध्ये इडन गार्डन पासून प्रोलाईफ प्रिस्टीन पर्यंतच्या सर्व जमिनी ह्या वाघमारे कुटुंबांच्या असल्यामुळे समस्त वाघमारे कुटुंबाच्या मागणीप्रमाणे इडन गार्डन शेजारील कॉर्नरसाठी वाघमारे कॉर्नर असे व प्रिस्टीन प्रोलाईफ सर्व्हे. नं.१७०/१० या चौकास विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नामकरण करणेस मंजुरी मिळणे.

४) प्रभाग क्र. २५ वाकड येथील शनी मंदिर मारुंजी रोड सर्व्हे नं. १०८/२/१ इलाईट होम हौसिंग सोसायटी समोर वाकड गावचे सुपुत्र कै. नारायण सोपानराव वाकडकर यांच्या नावाने चौकाचे नामकरण करणेबाबत

५) प्रभाग क्र. २६ (वाकड- पिंपळे निलख) मौजे वाकड सर्व्हे नं. १९३ दत्तमंदिर जवळील वाकड रोड, शेजारील कॉलनीस "कै. भरत हरिभाऊ कलाटे नगर" हे नाव स्थानिक रहिवासी यांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबत

६) मा. सभापती ड प्रभाग समिती यांचे सुचनेनुसार करावयाचे कामकाज

सही/-

जा.क्र.:डक्षे/१३/कावि/१५२ /०१८ प्रशासन अधिकारी तथा

दि. २८/ ०९ /२०१८ सचिव, सभा शाखा,

ड क्षेत्रिय कार्यालय, राहटणी, पुणे - १७